अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ ची शपथेवर जबाब

माझे नांव — शालिकराम सर्जेराव रोकडे,

माझे वय – ५९ वर्ष , धंदा : खाजगी नोकरी

राहणार – समर्थनगर, ता. जि. जालना.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही. व्ही. नगरकर यांच्यामार्फत सूरू**

०१. घटनेच्या वेळी मी एन.आर.बी कर्मचारी सहकारी पतसंस्था या संस्थेमध्ये कार्यरत होतो. दि.१७.०५.१९९९ रोजी मी संचालक म्हणुन निवडुन आलो. त्यानंतर दि.१७.०६.१९९९ रोजी पदाधिकाऱ्यांची निवडणुक झाली. पुर्वीचे अध्यक्ष बाबुराव कावळे व सचिव ठकाजी तमखाने यांनी निवडणुक झाल्यानंतर दोन महिन्यांनी सर्व अभिलेख दिला. मला सदर अभिलेख व लेखा परिक्षक अहवाल यावरुन अफरातफर झाल्याचे दिसुन आले. सदर अफरातफर आरोपी बाबुराव व ठकाजी तमखाने यांनी केल्याचे दिसुन आले. आरोपी बाबुराव आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एन. के. कोहिरे यांच्यामार्फत –**

**पुरसीस नि.क्र.७८ अन्वये आरोपी स्वतः साक्षीदाराचा उलटतपास करणार असल्याने साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे स्वतः –**

०२. हे मला आठवत नाही की, रुबी बँकेकडुन टिव्ही खरेदी साठी कर्ज घेतले होते व कर्जाची परतफेड करण्याकरीता संस्थेतर्फे साठ धनादेश दिले होते. माझे असे लक्षात आले की, ₹१,०७,०००/– खर्चाच्या पावत्या नसताना खर्च दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०४.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.